## उत्कर्ष जुनिअर कॉलेजमध्ये पोस्टर प्रेझेंटेशन कार्यक्रम उत्साहात संपन्न

उत्कर्ष जुनिअर कॉलेज, सांगोला येथील कॉमर्स विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सादरीकरण कौशल्य, संवादकौशल्य, आत्मविश्वास व व्यावहारिक ज्ञानाला चालना देण्यासाठी पोस्टर प्रेसेंटेशन व कॉमर्स संलग्नित विषयांवरील विद्यार्थ्यांच्या मनोगताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पेमेंट, KYC, डिजिटल मार्केटिंग, इन्शुरन्स, डिजिटल व्यवहार, बँकिंग सेवा तसेच आर्थिक व्यवहारातील सुरक्षितता आदी विविध विषयांवर माहिती संकलित करून पोस्टरच्या माध्यमातून प्रभावी सादरीकरण केले. तसेच निवडलेल्या विषयांवर विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून उपस्थितांसमोर आत्मविश्वासाने विचार मांडले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या विषयाचे आकलन, माहिती संकलन, सर्जनशीलता, वक्तृत्व, वेळेचे नियोजन, समूहकार्य आणि सादरीकरण कौशल्यांचा विकास होण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद दिला.

कॉमर्स विषयातील ज्ञानाला व्यावहारिक अनुभवाची जोड देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरला.

यावेळी उत्कर्ष माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री. सुनील कुलकर्णी, उत्कर्ष ज्युनियर कॉलेजच्या प्राचार्या सौ वर्षा कुलकर्णी,सर्व शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते





